# प्रेस नोट

राज्य राखीव पोलीस बल गट क्र. 4 नागपूरचे आस्थापनेवर एकूण 117 पदांकरिता सशस्त्र पोलीस शिपाई भरती - 2019 घेण्यात आली होती. परंतु मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रशिक्षण/पो.शि.भरती/कार्यपध्दती/717/2018/2783, दिनांक 22/10/2021 अन्वये मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी दिनांक 18/12/2020 महाराष्ट्र शासन विरूध्द केशव विश्वनाथ सोनोने आणि इतर यांची Civil appeal No. 4096, of 2020 मध्ये गोवारी हा समाज अनुसुचीत जमाती या प्रवर्गात येत नसल्याबाबत आदेश दिले आहेत. त्यानुसार गोवारी समाजातील अनुसुचीत जमाती या प्रवर्गात उमेदवारांनी अर्ज केले असल्यास अशा घटकांनी त्यांचे अंतिम निवडसुची तयार करू नये. असे मा.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, यांनी निर्देश दिलेले आहेत. त्याकारणाने अंतिम निवड यादी प्रकाशीत करण्यात आलेली नसुन, वरीष्ठ कार्यालयाकडून आदेश प्राप्त होताच अंतिम निवड यादी प्रकाशीत करण्यात येईल. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

COMMANDANT S.R.P.F. GR. IV NAGPUR

(पंकज डहाणे)
समादेशक
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.4 नागपूर